# देशदूत

शिल्पकार विकासाचा...

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नंदुरबार/धुळे आवृत्ती । रविवार, दि.१९ जुलै २०२६ । | मोबाईल आवृत्ती वाचा व वर







## काँग्रेसचे विजय वडेट्टीवार यांची टीका

**मुंबई ।** विद्यार्थ्यांच्या आत्महत्येला कारणीभूत ठरलेल्या, लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याची हेळसांड करणाऱ्या शिक्षणमंत्र्याला वाचवण्यासाठी मोदी सरकारने दडपशाहीच्या सर्व मर्यादा पार केल्या. संवाद हा भारताचा आत्मा आहे, लोकशाहीचे तत्व आहे. मात्र, मोदी सरकारने सोनम वांगचुक यांच्यासोबत कोणताही संवाद न करता थेट त्यांना फरफटत नेले असून ही अघोषित आणीबाणी आहे, अशी टीका काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी केली.

# हेच का तुमचे हिंदू राष्ट्र?

## संघाच्या माहेरघरात उद्धव ठाकरे गरजले : सरसंघचालकांना विचारला प्रश्न

**नागपूर ।** मला मोहन भागवत यांना विचारायचे आहे. एकदोन प्रश्न विचारले पाहिजेत. कारण हे नागपूर आहे. आलोय तर प्रश्न विचारले पाहिजेत. भागवत साहेब ज्या पद्धतीने भाजप वागत आहे. मंदिर लुटले जात आहे. पेपर फुटत आहेत. पक्ष तर फोडले जात आहे. आता मंदिरातील तिजोऱ्या फोडल्या जात आहेत. हेच हिंदू राष्ट्र तुम्हाला अपेक्षित होते काय? असा सवाल यावेळी उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

अयोध्येमधील राम मंदिरात झालेल्या चोरीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने संपूर्ण राज्यभरात रामरक्षा आंदोलन सुरू आहे. आज नागपूरमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे रामरक्षाआंदोलन पार पडले, यावेळी आयोजित सभेमध्ये बोलताना शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक



संघावर जोरदार हल्लाबोल केला आहे. देशासह राज्यात सध्या सुरू असलेल्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवत उद्धव ठाकरे यांनी थेट राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना काही प्रश्न विचारले आहेत.

दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, आमचे हिंदु राष्ट्र हे नव्हे. आमच्या हिंदुराष्ट्रात राम राज्य अपेक्षित आहे. शिवशाही अपेक्षित आहे. गोरगरीबांना विद्यार्थ्यांना न्याय देणारं आमचे हिंदू राष्ट्र आहे. कंत्राटदारांना अभय देणारं हे आमचे हिंदू राष्ट्र असू शकत नाही. भागवत साहेब तुम्ही म्हणाला होता, मुस्लिम या देशातीलच आहे. हिंदुंनी दोन ते तीन अपत्य जन्माला घातली पाहिजे. मग ही आपत्य जन्माला घातली, परीक्षेचे पेपर फुटले, अनेकांनी आत्महत्या केल्या, त्याचे काय करणार? आणखी अपत्य जन्माला घालून तुम्ही त्यांना असेच चिरडणार? हे हिंदू राष्ट्र आम्हाला अपेक्षित नाही, असंही यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. बाबरी पडली तेव्हा हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे उभे होते. एक फोन आला होता. तेव्हा हे काम माझ्या शिवसैनिकांनी केले असेल तर त्याचा मला गर्व आहे. गर्व से कहो हम हिंदू है ही घोषणा त्यांनी बुलंद केली. अनेक कारसेवकांनी बलिदान दिले, काहींना अपंगत्व आले. त्यांनी हा संघर्ष या चोरांच्या पोटापाण्यासाठी केला नव्हता, असा टोलाही यावेळी उद्धव ठाकरे यांनी लगावला आहे.

## अजमेरहून परतणाऱ्या नाशिकच्या दोन भाविकांचा मृत्यू; पाच जखमी

**धुळे ।** राजस्थान राज्यातील अजमेर येथून देवदर्शन करून नाशिककडे परतणाऱ्या भाविकांवर काळाने झडप घातली. कारला कंटेनरने जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला, तर पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक तीन वरील शिरपूर शहराजवळील भारत सेल्स सेंटरसमोर आज शनिवार, दि.१८ जुलै रोजी घडला. मोईनुद्दीन रफीक सय्यद (वय३०) आणि नवाज सादिक शेख (वय२७, दोघे रा. नाशिक) अशी दोघा मृतांची नावे आहेत. मोसीम मेहमूद शेख (वय ३२) हे आपल्या नातेवाईक तरुणासह कारने (क्र. एमएच १५ सीसी ०००१) अजमेरहून नाशिककडे परत येत होते. कार शिरपूर फाट्याजवळील भारत सेल्स सेंटरसमोर आली असता, त्यांच्या पुढे जाणाऱ्या कंटेनरच्या (क्र. एमएच २० ईजी २४४७) चालकाने आपले वाहन निष्काळजीपणे चालवून



अचानक वळण घेतले. त्यामुळे मागून येणारी कार या कंटेनरवर आदळली. धडक इतकी भीषण होती की कारचा अक्षरशः चक्काचूर झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि महामार्ग पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. जखमींना तत्काळ जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गंभीर जखमी मोईनुद्दीन सय्यद आणि नवाज शेख यांना उपचारादरम्यान डॉक्टरांनी मृत घोषित केले. अपघातात कार चालक मोसीम मेहमूद शेख यांच्यासह कैफ सादिक शेख, साबीर मोईन शेख, साहिल महमूद शेख आणि अयान शेख असरफुद्दीन हे पाच जण जखमी झाले.

### थोडक्यात



## डॉ.कुमार सप्तर्षी यांचे पुण्यात निधन

**पुणे ।** महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि वैचारिक क्षेत्रातील एक दीपस्तंभ, महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष आणि युवक क्रांती दलाचे संस्थापक डॉ. कुमार गणेश सप्तर्षी यांचे शनिवारी वयाच्या ८५ व्या वर्षी पुण्यात दुःखद निधन झाले. गेल्या काही काळापासून मधुमेहाने त्रस्त असलेल्या डॉ. सप्तर्षी यांना शनिवारी सकाळी अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने एरंडवणे येथील जोशी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. त्यांच्या निधनाने गांधीवादी, समाजवादी आणि परिवर्तनवादी चळवळीतील एक प्रखर विचारवंत आणि कृतीशील नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे.

## बियाणे, खताच्या तक्रारींचे सात दिवसांत निराकरण

**मुंबई ।** शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते आणि कीटकनाशके उपलब्ध करून देण्यास राज्य सरकारचे प्राधान्य असून याबाबत आलेल्या तक्रारींचे जलद पद्धतीने निराकरण करण्यात येणार आहे. यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समित्यांची फेररचना करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर पुढील सात दिवसांच्या आत प्रत्यक्ष शेतावर जाऊन तपासणी करून अहवाल अंतिम करण्यात येणार असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शनिवारी दिली.

## बुधवारी पुण्यात राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन

**मुंबई ।** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त येत्या २२ जुलै रोजी पुण्यातील कृषी महाविद्यालयात राज्यस्तरीय कृषी आणि पशुधन प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पुढील ऑगस्टमध्ये दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात प्रदर्शनाची सांगता करण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी शनिवारी दिली. या प्रदर्शनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार उपस्थित राहणार आहेत. हे कृषी प्रदर्शन राज्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक कृषी तंत्रज्ञान, नवकल्पना आणि मूल्यवर्धित शेतीचा प्रभावी मेळावा ठरेल, असा विश्वास भरणे यांनी यावेळी व्यक्त केला.

### केळी भाव

नवती (१) : 2450
नवती (२) : 1650

### मिश्कीली




## वांगचुक यांना रुग्णालयात केले दाखल

**नवी दिल्ली ।** दिल्लीतील जंतर मंतर येथे गेल्या २८ जूनपासून करणारे शिक्षणतज्ज्ञ व पर्यावरणवादी कार्यकर्ते बेमुदत उपोषणाला बसले होते. सोमवारी, २० जुलै रोजी नियोजित संसदेवर शांततापूर्व मोर्चामध्ये ते सहभागी होणार होते अशीही ग्वाही त्यांनी शुक्रावारीच दिली होती. पण शनिवारी सकाळी आंदोलनस्थळी मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. सकाळीच दिल्ली पोलिसांनी येऊन सोनम वांगचुक यांना रुग्णालायत दाखल केल्याचं दिसलं. यामुळे आंदोलनाच्या ठिकाणी मोठा गोंधळ निर्माण



झाला आहे अभिजीत दिपके यांनीही दिल्ली पोलिसांविरोधात काही धक्कादायक दावे केले आहेत.

या प्रकरणात दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार वांगचुक यांना आवश्यक वैद्यकीय उपचारांची गरज होती. त्यामुळे दिल्ली हायकोर्टाने दिलेल्या निर्देशांनुसार त्यांना रुग्णालयात हलवण्यात आलं आहे. त्यांना व्हीएमएमसी आणि सफदरगंज रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

### आंदोलन दडपण्याचा प्रयत्न

**नवी दिल्ली ।** गेल्या २० दिवसांपासून सामाजिक कार्यकर्ते तसेच शिक्षण क्षेत्रात मोठं काम करणारे सोनम वांगचूक बेमुदत अन्नत्याग आंदोलन करत आहेत. आता या आंदोलनाच्या २१ व्या दिवशी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. पोलिसांनी बळाचा वापर करून आमचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला आहे, असा दावा कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी केला आहे. सध्या सोनम वांगचूक यांच्यावर उपचार सुरू आहेत. परंतु त्यांनी अन्न खाण्यास विरोध केला असून माझे हे आंदोलन सुरूच राहील, अशी ठाम भूमिका घेतली आहे.

## अहमदाबादमध्ये स्फोट; आठ जणांचा मृत्यू

**अहमदाबाद ।** गुजरात येथील अहमदाबाद येथे एका फटाक्याच्या फॅक्टरीत मोठा स्फोट होऊन आग लागल्याने आठ कामगारांचा होरपळून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी घडली आहे. या स्फोटाचा आवाज अनेक किलोमीटरपर्यंत ऐकू आला. त्यामुळे संपूर्ण परिसरात अफरातफर माजली. या स्फोटात आठ लोकांचा मृत्यू झाला असून १५ जण जखमी झाले आहे.

अहमदाबाद येथील महमूदपुरा भागातील गॅट्रेड रोड येथील टॅलेंट फायरवर्क्स फॅक्ट्रीत मोठा स्फोट होऊन आग लागली. त्यामुळे संपूर्ण भागात मोठा आवाज आल्याने



घबराट पसरली. या दुर्घटनेत आता पर्यंत आठ जणांचे प्राण गेले आहेत. या स्फोटाची माहिती समजताच अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या. आणि जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्याचा प्रयत्न करीत बचाव मोहीम सुरु केली.

स्थानिक लोकांच्या मते आग लागल्यानंतर काही वेळाने फॅक्ट्रीच्या आत मोठे स्फोट झाल्याचे आवाज आले.



## ऐतिहासिक आणि अभिमानाचा क्षण

### खासगी रॉकेटमधून उपग्रहांचे यशस्वी लॉन्चिंग

**श्रीहरीकोटा ।** अवकाश संशोधन क्षेत्रातील भारताची खासगी कंपनी स्कायरुट एअरोस्पेसने आज एक मोठं यश मिळवले आहे. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन स्पेस सेंटरवरुन विक्रम-१ रॉकेट यशस्वीरित्या लॉन्च केलं. भारताच्या खासगी क्षेत्रातील हे पहिलं ऑर्बिटल रॉकेट लॉन्चिंग आहे. सगळ्या देशाला यावर अभिमान आहे. विक्रम-१ रॉकेट सकाळी ११.३० वाजता लॉन्च करण्यात आले. रॉकेट निर्धारित सर्व टप्पे पूर्ण केले. रॉकेटद्वारे उपग्रह ऑर्बिटमध्ये स्थापित करण्यात आला आहे. इस्रोच्या वैज्ञानिकांनी लॉन्चिंगची ही सर्व प्रक्रिया मॉनिटर केली. आगमन असे या मिशनचे नाव ठेवण्यात आले आहे. ही लॉन्चिंग फक्त स्कायरुटसाठी नाही, तर भारताच्या सगळ्या प्रायवेट सेक्टरसाठी मोठी संधी आहे. वर्ष २०२० मध्ये सरकारने स्पेस सेक्टरमध्ये अनेक बदल केले. त्यानंतर खासगी कंपन्यांना रॉकेट, सॅटलाइट आणि लॉन्च सर्विसवर काम करण्याची संधी मिळाली.

## यामी गौतमला राष्ट्रीय पुरस्कार!



**नवी दिल्ली ।** भारतीय मनोरंजन क्षेत्रात महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा आज नवी दिल्ली येथे करण्यात आलेली आहे. १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रदर्शित झालेल्या चित्रपटांचा ७२ व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात सन्मान केला जाणार आहे. कलाकार व तंत्रज्ञांना प्रोत्साहन देण्यासाठी, त्यांचा सन्मान करण्यासाठी भारत सरकारकडून राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केले जातात. यंदा सर्वोत्कृष्ट चित्रपटाचा पुरस्कार आर्टीकल३७०ला जाहीर करण्यात आला आहे. याशिवाय यामी गौतम यावर्षीची सर्वोत्कृष्ट अभिनेत्री ठरली असून, बॉलीवूड अभिनेता कार्तिक आर्यन आणि सुपरस्टार मामूटी यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार जाहीर झाला आहे. तर, मुक्काम पोस्ट बोंबिलवाडी सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट ठरला आहे.

## एसआयआरचा राजकारणाशी काहीही संबंध नाही!

### मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांची स्पष्टोक्ती



**नवी दिल्ली ।** मतदारयाद्यांच्या सखोल पडताळणी मोहिमेचा निवडणूक राजकारणाशी काहीही संबध नाही. मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक निवडणुका ही भारतीय लोकशाहीची सर्वांत मोठी ताकद आहे,असे केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नमूद केले.

येथे आयोजित अखिल भारतीय माध्यम परिषदेत ज्ञानेश कुमार बोलत होते. सर्व राज्यांतील ३५० पत्रकार या परिषदेला उपस्थित होते. निवडणूक आयोगाचे मनीष गर्ग, आशीष गोयल, राकेशकुमार वर्मा, सीमा खन्ना आदी अधिकारीही उपस्थित होते. देशातील प्रत्येक निवडणूक राज्यघटना, निवडणूक कायदे आणि निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार घेतली जाते. अत्यंत पारदर्शक निवडणुका होणाऱ्या अशा जगातील अत्यंत मोजक्या देशांत भारताचा समावेश आहे. निवडणूक आयोगाच्या प्रत्येक अधिकाऱ्याने आणि निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या प्रत्येकाने हे मूलभूत तत्त्व समजून घेतले पाहिजे आणि त्याचे पालन केले पाहिजे. निवडणूक प्रक्रियेबद्दल अचूक आणि वस्तुनिष्ठ माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यात माध्यमे महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे विश्वसनीय वृत्तांकन लोकशाही व्यवस्था मजबूत करण्यास आणि मतदारांचा विश्वास टिकवून ठेवण्यास मदत करते.

## सरकारकडे पैशांची कमी नाही पण...

### ना.महाजनांनी केली वस्त्रोद्योग विभागाची पाठराखण

**मुंबई ।** महिलांना रेशन दुकानाच्या माध्यमातून मोफत साडी देखील मिळत होती, मात्र ही योजना आता बंद झाली आहे, यावर विरोधकांनी टीका केली त्यानंतर ना.मंत्री गिरीश महाजन यांनी मोठी घोषणा केली आहे. सरकारकडे पैसे नाही, असा यात कुठला भाग नाहीये, परंतु रेशन दुकानांमधून साड्या वाटपामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. मात्र साड्या ऐवजी महिलांसाठी आम्ही आता एक वेगळी योजना राबवत आहोत, या नव्या योजनेच्या माध्यमातून महिलांना रोजगार मिळणार आहे, त्यांचा फायदाच फायदा होणार आहे, अशी घोषणा यावेळी गिरीश महाजन यांनी केली आहे. त्यासाठी सरकारला अधिक खर्च आला तरी चालेल परंतु आम्ही अशी योजना आणणार आहोत, असे यावेळी गिरीश महाजन यांनी म्हटले आहे.

दरम्यान गेल्या काही दिवसांपासून राष्ट्रवादी शरद पवार गट एनडीएमध्ये येणार असल्याची चर्चा सुरू आहे. आधी दोन्ही राष्ट्रवादींनी एकत्र यावे आणि मग एनडीएमध्ये यावे अशा सूचना भाजपने राष्ट्रवादी शरद पवार गटाला केली आहे. याबाबत गिरीश महाजन यांना विचारले असता त्यावर देखील त्यांनी यावेळी प्रतिक्रिया दिली आहे. याबाबतीत मला खरं म्हणजे काहीच माहिती नाही, या संदर्भातल्या कुठल्या चर्चेमध्ये सुद्धा मी नाहीये. या सर्व गोष्टी वरिष्ठ पातळीवरून चालल्या आहेत, आमचे मुख्यमंत्री असतील, भाजपचे अध्यक्ष असतील तसेच केंद्रीय नेतृत्व असेल त्यांच्यामध्ये या संदर्भात चर्चा होत असतील, असे महाजन यांनी म्हटले आहे.

दरम्यान शिवसेना शिंदे गटाकडून केंद्रात तीन मंत्रिपदाची मागणी करण्यात आली आहे, अशी देखील माहिती समोर येत आहे, यावर देखील महाजन यांनी यावेळी प्रतिक्रिया दिली आहे. एकनाथ शिंदे जी हे दिल्लीला जातात, त्यांचा संबंध डायरेक्ट केंद्र





शासनाशी आहे, मंत्र्यांशी आहे, नेत्यांशी आहे, त्यामुळे ते थेट त्यांच्याशी बोलत असतील, असं महाजन यांनी म्हटलं आहे

